॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade
आज़ादी का अमृत महोत्सव
ACADEMIC (AFFILIATION) SECTION
Phone: (02462) 215242 (Ext. - 152)
Fax:(02462) 215572
Website: srtmun.ac.in
email: affiliation@srtmun.ac.in

शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ साठी
प्रथम वर्षाकरिता वाढीव प्रवेशास
मान्यते बाबत.

## ::तातडीचे परिपत्रक ::

मा.प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ यांना मा. कुलगुरु महोदय यांच्या आदेशान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ करिता महाविद्यालयातील विद्याशाखा/अभ्यासक्रम विषय/तुकडी साठी ज्या महाविद्यालयांना **पदवी अभ्यासक्रमा करीता प्रथम वर्षाकरिता वाढीव प्रवेशाची** आवश्यकता आहे त्यांनी खालील नमूद केल्याप्रमाणे आपले प्रस्ताव संलग्नीकरण विभागात सादर करावेत. तसेच ज्या महाविद्यालयांनी यापुर्वी प्रस्ताव दाखल केलेले असतील तर त्यांनी त्रुटीची कागदपत्रे त्वरीत दाखल करावीत, जेणेकरून याकरीता पुढील कार्यवाही करता येईल.

१. विद्यार्थ्यांची अतिरीक्त प्रवेशवाढीची संख्या मान्यता तुकडीच्या जास्तीत जास्त २० टक्के इतकी राहील.
२. अतिरीक्त प्रवेशवाढ देत असतांना संबधीत शहरातील इतर महाविद्यालयांच्या प्रवेशावर परीणाम होणार नाही याबाबत हमीपत्र महाविद्यालयाने सादर करावे.
३. संबधीत महाविद्यालयाचे किमान एक वेळ नॅक मुल्यांकन झालेले असणे आवश्यक आहे. पूनर्मुल्यांकन पात्र असलेल्या महाविद्यालयाचे मुल्यांकन अवधी संपवून तीन वर्षा पेक्षा जास्त कालावधी असू नये व अशा महाविद्यालयांचे नियमीत वार्षिक AQAR दाखल केलेले असावेत व त्याचा पुरावा प्रस्तावा सोबत जोडावा.
४. संबधित महाविद्यालयात पुर्ण वेळ प्राचार्य नेमणूक झालेली असावी किंवा प्र. प्राचार्यांची विद्यापीठ मान्यता ही जास्तीत जास्त तीन वर्ष पर्यंतच असावी. त्यापेक्षा अधीक कालावधी असल्यास प्रस्ताव सादर करू नयेत.
५. अतिरीक्त विद्यार्थी वाढीव देत असते वेळी विद्यापीठाची कोणत्याही प्रकारची फिस महाविद्यालयाकडे बाकी असु नये. विद्यापीठाने दिलेली NOC प्रस्तावासोबत जोडण्यात यावी. तसेच शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी मा. व्यवस्थापन परिषद निर्णय व त्यानुषंगाने विद्यापीठ परिपत्रक दि. १४/०६/२०१७ प्रमाणे अतिरीक्त विद्यार्थी प्रवेशवाढीस शुल्क लागू राहील.

सदर परिपत्रक विद्यापीठाच्या www.srtmu.ac.in या संकेतस्थळावर affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करण्यात येत आहे.

''ज्ञानतीर्थ'', परिसर,
विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न–०३/२०२५–२०२६/356
दिनांक :– ११/०७/२०२५

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :–
१. मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर Affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करावे.